# भारतातील ज्ञान निर्मितीचा इतिहास

## घटक २ : विज्ञानाचा विकास

### ब. उपचार पद्धती - आयुर्वेद व युनानी

### आयुर्वेद संकल्पना

प्राचीन काळात भारतात स्वस्थ निकोप आयुष्याचे ज्ञान विकसित झाले. आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य देणाऱ्या या शास्त्रास आयुर्वेद म्हणतात. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा भाग आहे. मानवी शरीर व सृष्टीतील क्रिया प्रतिक्रियाचे यात चिंतन व संशोधन आहे. या आयुर्वेद ज्ञानास पुढे चरकसंहिता, सुश्रुतसंहिता आणि काश्यपसंहितामधून शास्त्रीय रूप मिळाले. नंतरही त्यात भर पडत गेली.

आयुर्वेदामध्ये आरोग्याची संकल्पना पुढीलप्रमाणे आली आहे. जो शारीरिक व मानसिक रोगांपासून मुक्त आहे; जो शारीरिक सुखे भोगू शकतो, इच्छेप्रमाणे वागू शकतो, मनाने समाधानी आहे; ज्याचे शरीर व मन यांवर नियंत्रण आहे; जो सामर्थ्यशाली, बुद्धिमान, कलाकार इ. सर्वांगांनी विकसित व्यक्तिमत्त्वाने युक्त आहे; जो स्वतःचे, इतरांचे व सर्व प्राणिमात्रांचे हित करणारा आहे; जो चारही पुरुषार्थांचे योग्य पालन करणारा आहे; ज्याला समाजात स्थान व मान आहे, जो आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रयत्न करीत आहे, ' तो संपूर्ण आरोग्यसंपन्न आहे. या संकल्पनेनुसार , आरोग्यसंपन्न व्यक्तीचे आरोग्य राखणे व रोगी व्यक्तीच्या रोगांचे निर्मूलन करणे हे आयुर्वेदाचे ध्येय आहे. त्यानुसार रोगनाशनी आणि प्रकृतिस्थापनी या दोन चिकित्सा आरोग्य देणाऱ्या, तिसरी रासायनिक चिकित्सा आरोग्य व सामर्थ्य देणारी, चौथी नैष्ठिकी चिकित्सा संपूर्ण दुःखनाश

करणारी (संपूर्ण सुखदायक) अशा एकूण चार चिकित्सा आयुर्वेदात सांगितल्या आहेत. संपूर्ण सुखावस्था म्हणजेच मोक्ष. म्हणून मोक्षप्राप्ती हेच आयुर्वेदाचे अंतिम ध्येय आहे.

**आयुर्वेद शास्त्राचे प्रयोजन**

१) आरोग्य संरक्षण: निरोगी व्यक्तीचे आरोग्य टिकवून ठेवणे, जेणेकरून ते आजारी पडू नये. २) रोग निवारण: आजारी व्यक्तीच्या आजारांवर उपचार करणे आणि त्यांना बरे करणे. ३) शरीर आणि मनाचे संतुलन: शरीरातील दोषांचे (वात, पित्त, कफ) संतुलन राखणे आणि मन, शरीर व आत्मा यांच्यात सुसंवाद निर्माण करणे. ४) नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढवणे: आहाराचे नियम, व्यायाम आणि वनौषधींच्या माध्यमातून शरीराची नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती वाढवणे. ५) दीर्घकालीन आजारांवर उपचार: मधुमेह, हृदयविकार, दमा आणि संधिवात यांसारख्या दीर्घकालीन आजारांवर उपचार करणे. ६) दीर्घायुष्य: 'जीवनाचे विज्ञान' या नात्याने, दीर्घ आणि निरोगी आयुष्य जगण्यासाठी मार्गदर्शन करणे

**आयुर्वेदाची मूळ तत्वे**

आयुर्वेदानुसार सर्व शारीरिक प्रक्रिया तीन दोषांच्या संतुलनातून नियंत्रित केल्या जातात. त्यात पुढील तीन दोष (त्रिदोष सिद्धांत) महत्त्वाचे आहेत.

**१) वात दोष**

हा शरीर आणि मनाची हालचाल नियंत्रित करतोजास्त वातामुळे काळजी ., निद्रानाश, बद्धकोष्ठता, इत्यादी त्रास होतातवात रक्त पुरवठा ., श्वासोच्छ्वास, मनातील विचार इत्यादी गोष्टींवर नियंत्रण ठेवतोवातामुळे . मज्जासंस्था, श्रवण, वाणी कार्यान्वित होतातवातामुळे उत्साह .

बऱ .वाताचा पित्त आणि कफ यांच्यावरही परिणाम होतो .आणि सर्जनक्षमता वाढतात्याचवेळा वातदोष हे रोगाचे पहिले कारण असते.वाताला वायू असेही म्हणतात .

**२) कफ दोष**

कफ आप तत्त्वापासून बनतो. कफामुळे शरीरातील मूलद्रव्यांना मूर्त स्वरूप मिळते, प्रतिकारशक्ती वाढते. कफ सांध्यामधील स्नेहक, जखम भरणे, ताकद, संतुलन, स्मरणशक्ती, हृदय व फुप्फुसे यांना नियंत्रित करतो. कफामुळे आपुलकी, प्रेम, शांतता हाव, मत्सर हे गुण मिळतात. अतिकफामुळे स्थूलता, सुस्ती आणि प्रत्यूर्जता इत्यादी त्रास होतात.

**३) पित्त दोष**

पित्ताची निर्मिती आप आणि अग्नि या तत्त्वांपासून होते असे मानले जाते. पित्त शरीरातील उष्णता, चयापचय, मन आणि शरीर यांचे रूपांतरण, अन्नपचन, संवेदना, सदसदविवेकबुद्धी इत्यादी गोष्टींवर नियंत्रण ठेवते. अति पित्तामुळे राग, आलोचना, व्रण, पुरळ, इत्यादी त्रास होतात. संतुलित पित्ताने नेतृत्व गुण विकसित होतात.

**आयुर्वेद तज्ज्ञ व जनक आणि त्याचे कार्य**

**चरक**

आयुर्वेदातील चरकसंहिता नावाने प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते चरक आहेत. त्यांच्या या ग्रंथात उत्तर भारताच्या पश्चिमोत्तर प्रदेशाची वर्णने आढळतात. यावरून ते त्या भागातील रहिवासी असावेत. ज्या कनिष्क राजाच्या पदरी ते राजवैद्य होते त्याची राजधानी याचभागात होती. इ.स. पू . पहिल्या शतकाच्या सुमारास हा राजा होऊन गेला असावा, असे एक मत आहे. राजा

कनिष्क व आर्य नागार्जुन समकालीन व्यक्ती असाव्यात. कनिष्काचा काळ अनिश्चित असल्यामुळे चरकांचा काळही अनिश्चित आहे. याविषयी तीन भिन्न काळ पुढे केले जातात ते असे: इ.स. पू . ७८ , इ.स. ७८ किंवा इ.स. १२३. यांपैकी शेवटच्यास जास्त पाठिंबा मिळतो. त्रिपिटक या बौद्ध ग्रंथाच्या चिनी भाषांतरात (इ.स. ४७७) कनिष्काच्या राजवैद्यांचे नाव चरक असल्याचा उल्लेख आहे. यात्र चरकांनी मूळच्या अग्निवेश तंत्र या ग्रंथाचे पुनः संपादन केले असावे, असे मानले जाते. चरक मानवाचे हित करण्याकरिता हिंडत आणि जनतेची मानसिक व शारीरिक दुःखे दूर करीत. म्हणून पुढे चरक या शब्दास वैद्य हा अर्थ प्राप्त झाला असावा.

**चरकसंहिता**

हा आयुर्वेदातील संस्कृत भाषेतील आद्य व मुख्य असा ग्रंथ आहे. या ग्रंथाची रचना इसवी सनापूर्वी होऊन त्यात पुढे भर पडली. पुनर्वसु आत्रेय यांच्याजवळ सहा शिष्य विद्यार्जन करीत होते. अग्निवेश, जतूकर्ण, पाराशर, भेड, हारीत आणि क्षीरपाणी अशी त्यांची नावे होती. या सर्वच शिष्यांनी वैद्यकावर ग्रंथ लिहिले. अग्निवेशाने लिहिलेल्या ग्रंथास अग्निवेशतंत्र म्हणत. अग्निवेशाने आपल्या पुनर्वसु आत्रेय या आचार्यांचा वारंवार उल्लेख यात केला आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या शेवटास ही सहा ' तंत्रे ' उपलब्ध असावीत. हल्ली अग्निवेशतंत्र व भेडसंहिता उपलब्ध आहेत. अग्निवेश तंत्राचे पुनः संपादन कनिष्क राजाच्या राजवैद्य चरकांनी केले व म्हणून तो ग्रंथ चरकसंहिता म्हणून ओळखला जाऊ लागला. नंतर काही शतकानंतर कपिलबलपुत्र दृढबल नावाच्या काश्मिरी वैद्यांनी या चरकसंहितेत भर घातली. हल्ली उपलब्ध असलेल्या ग्रंथातील कोणता भाग कुणी संपादित केला हे सांगणे कठीण आहे. थोडक्यात मूळची आत्रेय संहिताच नंतर चरकसंहिता बनली. या ग्रंथात एकूण आठ प्रकरणे आहेत. चरकसंहितेवर संस्कृतमध्ये लिहिलेल्या पुष्कळ टीका आज उपलब्ध आहेत. या ग्रंथाचा अरबी भाषेत अनुवाद झालेला आहे. चरकसंहिता ग्रंथाचे महत्त्व केवळ आयुर्वेदापुरतेच मर्यादित नसून अध्यापन

देवतावाद, पूजा इ. त्या काळातील ग्रंथांवरही उत्तम प्रकाश पडतो. मुख्यत्वे चिकित्साविज्ञानविषयक मौल्यवान तत्त्वे या ग्रंथात विशद केलेली असली, तरी प्रसंगोपात्त सांख्य, योग, न्याय इ. विषयांचा परामर्षही त्यात घेतलेला आहे.

**सुश्रुत**

सुश्रुत हे प्राचीन भारतीय आयुर्वेद्याचार्य आणि शल्यतंत्रपारंगत होते. ते भारतीय शल्यतंत्राचे आद्य प्रणेते (Father of Surgery) मानले जातात. त्यांचा काल व चरित्रात्मक तपशील निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि, भारतीय आयुर्विज्ञान संस्था, दिल्ली येथील एन्. एल्. केसवानी ह्यांच्या मते, सुश्रुतांच्या काळाची पूर्वमर्यादा इ.स.पू. ६०० ही होय. सुश्रुत हे दिवोदास काशीराज या धन्वंतरीचे शिष्य होते, असा उल्लेख हेमाद्रिकृत लक्षणप्रकाशा तील अवप्रकरणामधील एका श्लोकात आला आहे . यूरोप, अरबस्तान, ग्रीस, कंबोडिया आणि इंडोचायना येथे नवव्या व दहाव्या शतकांत सुश्रुतांचे नाव माहीत झाले होते. अरबस्तानातील वैद्य राझी (इ.स.पू.पहिले शतक) यांनी सुश्रुतांच्या ग्रंथातून शल्यक्रियेचे तंत्र माहीत झाल्याचा उल्लेख त्यांच्या ग्रंथात केला आहे.

**सुश्रुतसंहिता**

शव विच्छेदनाचे वर्णन पहिल्यांदा सुश्रुत यांनी केले आहे. त्याच्या छेदनापासून शरीरातील विविध रचनांची अवयवांची माहिती मिळते . याशिवाय हृदयाला कापून त्याची अभ्यंतर रचना जाणून घेतली जात असल्याचे वर्णन संहितेत येते. अशामुळे त्याना शरीर शास्त्राचाही जनक म्हटले जाते. संधानशल्य (Plastic Surgery) चा उल्लेख ही संहितेत आढळतो सुश्रुतसंहिते वर जैय्यट (जज्जट वा जैज्जट) आणि गयदास यांनी लिहिलेल्या प्राचीन टीका आज उपलब्ध नाहीत. चक्रदत्त आणि डल्हण यांच्या अनुक्रमे अकराव्या व बाराव्या शतकातील भानुमती व

निबंधसंग्रह या टीका उपलब्ध आहेत. सुश्रुतसंहिता या ग्रंथाचे लॅटिन, जर्मन, इंग्रजी तसेच फार्सी अरबी भाषांत अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. इसवी सनापूर्वी आणि त्यानंतर कित्येक शतके भारतामध्ये सुश्रुत यांची शल्यविद्या प्रमाण मानली जात होती. बौद्ध काळातही सुश्रुत यांचे वैद्यक मूलभूत मानीत. अशाप्रकारे सुश्रुत संहिता हा एक महत्वा ग्रंथ आहे असे म्हणता येईल.

**जीवक**

जीवक कौमारभच हे प्राचीन भारतातील एक आयुर्वेदाचार्य होते. अनेक बौद्ध ग्रंथांमध्ये त्यांचा उल्लेख आहे. ते बालरोगतज्ज्ञ असून गौतम बुद्धांचे खासगी वैद्य होते. जीवक कौमारभन्ज्ञांचा जन्म बिंबिसार राजाच्या कारकिर्दीत मगध देशाच्या राजधानीत (सध्याचे राजगीर) झाला. त्यांची आई एक गणिका होती. लोकलाजेस्तव आईने त्यांनी ते तान्हे असतानाच एका कचऱ्याच्या डिगावर फेकून दिले. बिंबिसारचा मुलगा अभय याला हे समजले. त्यांनी जीवकाला घरी आणून त्याच्या पालन पोषणाची व्यवस्था केली व उच्च शिक्षणासाठी त्याला तक्षशिला विश्वविद्यालयात पाठवले. तेथे अत्रेयांच्या हाताखाली सात वर्षे अभ्यास करून जीवक आयुर्वेदाचार्य बनले. जीवक कौमारभन्न आयुर्वेद शास्त्राच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण स्थ मिळवतात, कारण ते केवळ बुद्धाचे वैद्य नव्हते, तर प्राचीन भारतातील आयुर्वेदिक वैद्यकीय परंपरेचे एक महान प्रतिनिधी होते. त्यांच्या कार्याचा मुख्य भर आयुर्वेदातील व्यावहारिक ज्ञानावर होता . त्यांनी केवळ बालरोग (कौमारभृत्य) क्षेत्रातच नव्हे, तर इतर अनेक वैद्यकीय क्षेत्रांतही प्रवीणता मिळवली होती. आयुर्वेदाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान खालीलप्रमाणे समजले.

जीवक यांनी आयुर्वेदाच्या विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. ते बालरोगतज्ज्ञ (कौमारभृत्य) म्हणून ओळखले जातात आणि त्यांनी बालकांच्या आरोग्यासाठी विशेष उपचारपद्धती विकसित केल्या. तक्षशिला विद्यापीठात त्यांनी शल्यकर्म आणि औषधनिर्मितीचे

सखोल ज्ञान मिळवले आणि कुशल शल्यचिकित्सक म्हणून अनेक जटिल शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. औषधनिर्मितीत निपुण असलेल्या जीवक यांनी नैसर्गिक घटकांचा वापर करून प्रभावी औषधे तयार केली, ज्यामुळे रुग्णांना त्वरित आराम मिळायचा. गौतम बुद्धांचे खासगी वैद्य म्हणून त्यांनी बुद्धांच्या गंभीर आजारांवर उपचार केले आणि त्यांचे आरोग्य राखले. हिमालयातील दुर्गम भागांमध्ये जाऊन त्यांनी विविध औषधी वनस्पतींचा अभ्यास केला आणि त्यांचा उपयोग औषधनिर्मितीसाठी केला. गरीब आणि गरजूंसाठी समर्पित असलेल्या जीवक यांनी राजदरबारी वैद्य असूनही सामान्य लोकांवर उपचार केले आणि समाजसेवेसाठी आपले जीवन समर्पित केले. तसेच त्यांनी आयुर्वेदातील उपचारपद्धतींचा प्रचार व प्रसार केला आणि वैद्यकीय ज्ञान अधिक व्यापक केले. जीवक कौमारभृत्य हे आयुर्वेदाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी एक प्रेरणास्रोत आहेत. त्यांच्या कार्यामुळे आयुर्वेदाची बालोपचार, शल्यचिकित्सा, आणि औषधनिर्मिती या शाखांना महत्त्वपूर्ण दिशा मिळाली. त्यांनी प्राचीन वैद्यकीय परंपरेला नवीन आयाम दिला.

## युनानी

### युनानी वैद्यक संकल्पना आणि अर्थ

युनानी वैद्यक ही एक प्राचीन उपचार पद्धती आहे, जी ग्रीक आणि इस्लामिक जगाच्या ज्ञानावर आधारित आहे. याचा उगम प्राचीन ग्रीसमध्ये झाला. वैद्यकशास्त्राचा जनक हिप्पोक्रेट्स व गॅलेन यांनी या उपचार पद्धतीचे तत्त्वज्ञान विकसित केले. नंतर ही पद्धती अरब देशांमध्ये प्रसिद्ध झाली आणि अरबी तत्त्वज्ञांनी आणि विद्वानांनी याचा अभ्यास करून यामध्ये सुधारणा केल्या. ॲलोपॅथी अथवा विषम चिकित्सा, होमिओपॅथी अथवा समचिकित्सा किंवा आयुर्वेदिक चिकित्सा याप्रमाणेच एका चिकित्सेला 'युनानी वैद्यक' अथवा 'युनानी चिकित्सा' म्हणतात. युनानी हा शब्द यवनानी या मूळ संस्कृत शब्दापासून बनला आहे व त्याचा अर्थ यवनांची लिपी असा आहे. यवन यांचा अर्थ ग्रीक पुरुष (अनार्य) असा आहे. अरबांनी ग्रीक वैद्यक आत्मसात केल्यानंतर त्यात भर घालून स्वतःचे प्रगत वैद्यक तयार केले. त्याच्या मूळ सुरुवातीमुळे त्यास 'युनानी वैद्यक' म्हणतात. काहींच्या मताप्रमाणे 'अमोनियन' या मूळ ग्रीक शब्दावरून 'युनानी' हा शब्द बनला आहे.

### युनानी वैद्यकाचे तत्त्वज्ञान

युनानी वैद्यकाचे मुख्य तत्त्व म्हणजे शरीरातील दम (रक्त) अलगम (फ्लेम) सफरा (पित्त) सौदा (कफ) या चार द्रव्यांवर (अखलात) आधारित संतुलन, या चार द्रव्यांचे संतुलन राखल्याने शरीर निरोगी राहते, तर यांचे असंतुलन रोगाचे कारण बनते. या चार द्रव्यांना 'ह्यूमर्स' असे म्हटले जाते.

१) दम (रक्त) हे शरीरातील उष्णता आणि आर्द्रतेचे प्रतिनिधित्व करते.

२) बलगम (फ्लेम) थंड आणि ओलसर प्रकृती होय. याचा अर्थ श्लेष्मा अथवा कफ यापुरताच मर्यादित नसून मुख्यत्वे उष्णता नियंत्रणाशी संबंधित अशी ही संज्ञा असून श्लेष्मा, संधिरस इत्यादी संरक्षणात्मक द्रव्यांकरिताही वापरतात. शरीरद्रव्य अथवा खिल्तची व्याख्या युनानी वैद्यकात अशी केली आहे. "सेवन केलेल्या अन्नपदार्थापासून यकृतात निर्माण होणारे, शरीरपोषणास समर्थ असे आर्द्र व द्रव पदार्थ"

३) सफरा (पित्त) म्हणजे उष्ण आणि कोरडी प्रकृती होय. याचा अर्थ पित्त या यकृतस्रावापुरताच मर्यादित नसून शरीराच्या उष्णतोत्पादक क्रिया व पचनक्रियेशी पचनक्रियेसहित सर्व चयापचय (शरीरात सतत होणाऱ्या भौतिक व रासायनिक घडामोडी), रक्ताचा रंग, सर्व स्रावोत्पादन व उत्सर्जन यांचा त्यात समावेश होतो.

४) सौदा (कफ) म्हणजे थंड आणि कोरडी प्रकृती होय. दृश्य किंवा स्थूल स्वरूपात असणारी, उदा., स्राव उत्सर्जित पदार्थ म्हणून वरील क्रियांमुळे उत्पन्न होतात. या दोन प्रकारांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. आवश्यक प्रकारातील खिल्तचा बिघाड ताबडतोब संबंधित स्रावावर व उत्सर्जित पदार्थांवर दुष्परिणाम करतो व ते वाढतात किंवा दुषित होतात. रक्त जेव्हा यकृतातून बाहेर पडते तेव्हा चारही खिल्त त्यात असतात. अन्नरसापासून अधिकांश रक्त त्यानंतर बलगम, त्याखालोखाल सफरा आणि अल्प प्रमाणात सौदा यांची निर्मिती होते. ते विकृत झाल्यास त्यांच्या वर्ण, रुची, घनता इत्यादी गुणधर्मात बदल होतो व निरनिराळ्या रोगांची उत्पत्ती होते.

**उपचार प्रक्रिया**

युनानी वैद्यक पद्धती रोगांचे निदान व उपचार करण्यासाठी शरीरातील या द्रव्यांचे संतुलन पुनस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित करते. शरीराचे नैसर्गिक तापमान, हवेतील गुणधर्म, आहार

आणि जीवनशैली यावर आधारित, वैद्य उपचार पद्धती ठरवितात. हे उपचार शरीरातील उष्णता, थंडी, ओलसरता आणि कोरडेपणाचे योग्य प्रमाण साधण्यासाठी असतात.

**निदान पद्धती**

युनानी वैद्यक पद्धतीमध्ये विविध निदान पद्धती वापरल्या जातात.

१) नाडी परीक्षण : नाडीच्या गती आणि तालावरून शरीरातील द्रव्यांचे संतुलन तपासले जाते.

२) मूत्र परीक्षण मूत्राचा रंग, गंध आणि घट्टपणा पाहून शरीरातील दोष ओळखले जातात.

३) मल (स्टूल) परीक्षण मलाच्या रंग, गंध आणि घट्टपणावरून रोगाची माहिती मिळते.

थोडक्यात रुग्ण परीक्षणाने निश्चित केलेली रोगचिन्हे व रोगलक्षणे यांवरून रोगनिदान व चिकित्सा युनानी वैद्यकात केली जाते. रोगाचे नाव प्रमुख रोगचिन्हावरून दिले जाते. रोगनिदानाकरिता नाडी परीक्षा (युनानी निब्द ) प्रमुख साधन असून निष्णात हकीम यात तरबेज असतो. ॲव्हिसेना यांच्या मताप्रमाणे नाडीचे दहा प्रकार असून त्यावरून शरीराची स्थिती ठरविता येते. याशिवाय निदानोपयोगी नाडीचे सत्तावीस उपप्रकार सांगितले आहेत. नाडीशिवाय हकीम निदानाकरिता मूत्र ( बौल ) आणि मल ( बराज ) परीक्षणांचाही उपयोग करतात. नाडी परीक्षेत प्रवीण असलेल्या हकिमास ' नब्बाद ' म्हणतात. मूत्राच्या रंगावरून निदानास मदत होते. मूत्राचे एकूण अठरा प्रकारचे रंग असून ते निरनिराळे रोग दर्शवितात.

**उपचार पद्धती**

१) औषधी वनस्पतींचा वापर विविध औषधी वनस्पती आणि खनिजांचा वापर केला जातो.

२) आहारशास्त्र : आहाराचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. योग्य आहार घेतल्याने शरीराची द्रव्ये संतुलित राहतात.

३) पंचकर्म : शरीरातील विषारी द्रव्ये काढून टाकण्यासाठी पद्धती वापरल्या जातात.

४) नैसर्गिक थेरपी मालिश, हिजामा (कपिंग थेरपी) यांसारख्या पद्धतींचा वापर होती.

५) आहार आणि जीवनशैलीतील बदल : रोगनिदानानंतर रुग्णाच्या आहारात आणि जीवनशैलीत बदल सुचविले जातात.

**युनानी औषधे**

युनानी औषधांमध्ये बहुधा वनस्पती, खनिजे आणि नैसर्गिक पदार्थांचा वापर होतो. यामध्ये चूर्ण, अर्क, आसव, लेप, तेल आणि इतर स्वरूपात औषधे दिली जातात.

**युनानी मूलभूत सिद्धान्त**

हा सिद्धान्त समजण्याकरिता मूळ ग्रीक वैद्यकातील शरीरद्रव्य सिद्धान्त समजला पाहिजे. १. रक्त २. पीत पित्त ३. कृष्ण पित्त ४. श्लेष्मा या चार द्रव्यांचे संतुलित व योग्य मिश्रण म्हणजे स्वास्थ्य आणि असंतुलित मिश्रण म्हणजे अस्वास्थ्य, रोग ही मूलभूत संकल्पना आहे. याशिवाय चार मूलघटक व चार प्रमुख गुणधर्म शरीर प्रवृत्ती बनवितात, तेज, पृथ्वी, जल व वायू आणि संनिकृष्ट गुणधर्म उष्ण, शुष्कशीत व आर्द्र यांना समान अशी चार शरीरद्रव्ये पुढीलप्रमाणे आहेत

उष्ण + सांद्र (आर्द्र) = रक्त उष्ण + - शुष्क = पीत पित्त

शीत + शुष्क = कृष्ण पित्त शीत + सांद्र ( आर्द्र ) = श्लेष्मा

युनानीमध्ये 'रक्त', 'बलगम', 'सफरा' व 'सौदा' अशी चार शरीरद्रव्ये (युनानीमध्ये यांना 'खिल्त' म्हणतात.) मानली आहेत. चार शरीरद्रव्यांना मिळून अरब्लात-ए-अरब 'अ' असे म्हणतात.

**प्राचीन शरीरद्रव्य सिद्धान्त इतिहास आणि युनानी व ग्रीक वैद्यकांचे संबंध**

१) पायथागोरस (इ.स.पू.च्या ५७५-४९५)

या ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या मुलघटकांच्या चार प्रमुख गुणधमांच्या (उष्ण, शीत, आर्द्र व शुष्क) सिद्धान्तावर आधारित.

२) हिप्पोक्रिटस् (इ.स.पू.सुमारे ४६०-३७०)

यांच्या शरीरद्रव्य सिद्धान्तावर ग्रीक वैद्यक आधारलेले होते. ग्रीक वैद्यकातील शरीराच्या आत्मसंरक्षण किंवा समायोजन क्षमतेच्या सिद्धन्ताप्रमाणे शरीर कोणताही विक्षोभ वैयक्तिक प्रवृत्तीच्या मयविनुसार दूर करू शकते. मूलघटक व शरीरद्रव्ये एकमेकांशी संबंधित असून शरीरद्रव्यांचे योग्य व संतुलित मिश्रण म्हणजेच शरीर व मनाचे स्वास्थ्य आणि त्यातील बिघाड म्हणजेच रोग असा हा प्राचीन सिद्धान्त होता. आकृतीत शरीरद्रव्ये (पीत पित्त, कृष्ण पित्त, श्लेष्मा अथवा कफ व रक्त), मूलघटक (तेज, पृथ्वी, जल व वायू) आणि त्यांचे गुणधर्म (उष्ण, शुष्क, शीत व आर्द्र) दर्शविले जातात. युनानी वैद्यक याच प्रकारच्या सिद्धान्तावर आधारलेले असून युनानी हकीम आपल्या औषधांनी शरीराची आत्मसंरक्षणाची क्षमता जागृत करण्याचा किंवा वाढविण्याचा प्रयत्न करतो. रोमनांनी ग्रीकांचा पराभव केल्यानंतर पुढे एक हजार वर्षे ग्रीक वैद्यक मागे पडले.

३) गेलेन (इ.स.१३१ - २०१)

या ग्रीक वैद्यांनी त्यांच्या काळातील सर्व उपलब्ध वैद्यकीय माहिती गोळा केली व तिची भक्कम पायावर सुबद्ध मांडणी केली. त्यांच्या अतिविस्तृत ज्ञानाची कल्पना त्यांच्याच अवाढव्य ग्रंथरचनेवरून करता येते. गेलेननंतर पुढे पंधरा शतके त्यांचे सिद्धान्त सर्वमान्य आधार बनले. पुढे काही शतके वैद्यकीय व्यवसाय सर्वस्वी धर्माधिकाऱ्यांच्या ताब्यात होता. नैस्टोरियन लोकांनी ( कॉन्स्टेटिनोपल येथील 5 व्या शतकातील मूळ पुरुष नेस्टोरिअस यांच्या अनुयायांनी ) पर्शियामध्ये काही वैद्यकीय शाळा सुरू केल्या व त्या वेळी ग्रीक वैद्यकीय लिखाणाचे सिरिअँक भाषेत भाषांतर केले गेले , यापैकी एक शाळा युफ्रेटीस नदीकाठी होती व त्या शाळेकरिता ग्रीक वैद्यकाचे पहिले अरबी भाषांतर केले गेले. ग्रीक व अरबी वैद्यक यांच्या दीर्घकालीन युतीमुळे ग्रीक वैद्यकाचे मूळ स्वरूप पार बदलले. ग्रीक वैद्य फक्त अनुभवसिद्धतेवर व गूढवादावर विसंबून असत. अरबांनी गणित , भौतिकी , रसायनशास्त्र , भूगोलशास्त्र , वनस्पतिशास्त्र व वैद्यक यांचे ज्ञान युरोपला प्रदान केले. वैद्यकासंबंधीची ही परिस्थिती सुमारे सहाशे वर्षे अस्तित्वात होती , असे निश्चित सांगता येते.

४) ॲरिस्टॉटल (इ.स.पू. ३८३ - ३२२)

ॲरिस्टॉटल व गेलेन यांच्या वैद्यकीय तत्त्वांची जुळणी करण्याचा प्रयत्न या महान संघात केला असून मध्ययुगात तो एक आधार ग्रंथ बनला होता. ग्रीक वैद्यकातील विखुरलेल्या ज्ञानाचे वर्गीकरण , उपकरण वैद्यकाची सुरुवात आणि नव्या रोगवर्णनाची विकृती विज्ञानातील भर ही अरबी वैद्यकाच्या प्रगतीची क्षेत्रे होती. इ.स. ७०० - ११०० या काळात अरबी भाषेत वैद्यकावर भरपूर ग्रंथलेखन झाले.

५) ॲव्हिसेना ऊर्फ इब्न सीना (इ.स.९८० - १०३७)

बगदादच्या खलिफाचे वजीर व वैद्य होते , निरनिराळ्या विषयांवर त्यांनी शंभरपेक्षा जास्त ग्रंथ लिहिले होते. त्यांपैकी 'अल् - कानून की कल - तिब्ब' या ग्रंथात संपूर्ण वैद्यकीय ज्ञान क्रमवार संग्रहित केले आहे.

६) हारुन अल्- रशीद (इ.स. ७६४ - ८०९)

अरबी वैद्यक व आयुर्वेद यांचा संबंध हारून-अल्-रशीद यांच्या काळापासून प्रस्थापित झाला होता. काही आयुर्वेद शास्त्रज्ञांना बगदाद भेटीचे आमंत्रण दिल्याची घटना ऐतिहासिक सत्य आहे. भारतात युनानी हकिमांनी सुश्रुत, वाग्भट, शाङ्गधर इत्यादींच्या आयुर्वेदिक संचातून योग्य त्या भागांचा उपयोग केला होता

**भारतातील युनानी वैद्यकाचा इतिहास**

1१२ व्या शतकात भारतात याचा प्रसार झाला आणि आजही भारतात ही वैद्यक पद्धती लोकप्रिय आहे. १२ व्या शतकात युनानी वैद्यक भारतात आले. मुघल साम्राज्यात हे वैद्यक पद्धती मोठ्या प्रमाणात वापरली जात असे. युनानी वैद्यकाचे शिक्षण आणि उपचार देणारे महत्त्वाचे केंद्र म्हणजे अजमेरी शरीफ आणि लखनौ, भारतात अजूनही ही पद्धती मोठ्या प्रमाणावर वापरली जाते आणि सरकारदवारे मान्यताप्राप्त आहे. युनानी वैद्यक आजही भारत, पाकिस्तान, बांगलादेश, इराण आणि अरब देशांमध्ये लोकप्रिय आहे.

**परिस्थितीनुसार झालेले बदल**

युनानी वैद्यक भारतात प्रथम अरब व्यापाऱ्यांबरोबर आले व कालांतराने मुघल राज्यकर्त्यांमुळे प्रसूत झाले. काही काळ दिल्लीमध्ये त्याची बगदादएवढीच भरभराट झाली होती.

भारतीय हकिमांनी स्थानिक हवामानास अनुकूल असे बदल करून ते पूर्णपणे देशी बनविले. अरबी भाषेतील वैद्यकीय ग्रंथ प्रथम पर्शियन भाषेत व नंतर उर्दू भाषेत भाषांतरित झाले.

**मसिहूल मुल्क हकीम अजमल खान यांनी उभारलेली युनानी वैद्यकीय महाविद्यालये**

मसिद्दल मूल्क हकीम अजमल खान यांनी अलीकडील काळात भारतातील युनानी वैद्यकास सुबद्ध करण्याचा पहिला प्रयत्न केला. दिल्ली येथे टिब्बिया कॉलेज स्थापन केले. ते १९२७ मध्ये पैगंबरवासी होईपर्यंत हजारो युनानी पदवीधर तयार झाले होते. याशिवाय अलिगढला अजमल खान टिब्बिया कॉलेज, दिल्लीस हमदर्द टिब्बी कॉलेज व आयुर्वेदिक अँड युनानी टिब्बिया कॉलेज तसेच मुंबई, चेन्नई व उस्मानिया या विद्यापीठांतील वैद्यकीय महाविद्यालयांत युनानी वैद्यकाच्या शिक्षणाची सोय आहे.

**युनानी वैद्यक संशोधन**

अलीकडे युनानी औषधे मोठ्या प्रमाणावर आधुनिक उपकरणे व तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात येत आहेत. आधुनिक ॲलोपॅथिक औषधांप्रमाणेच ती विक्रीकरिता आवेष्टित करण्यात येतात व त्यांचे संशोधनही चालू आहे.

१) हकीम अजमल खान : हकीम अजमल खान यांनी सर्पगंधा ( रॉव्होल्फिया सर्पेंटिना ) या अतिरक्त दाबावरील गुणकारी वनस्पतींचे गुणधर्म शोधल्याचे सांगतात. २) दिल्ली : दिल्ली येथील हमदर्द रिसर्च क्लिनिक अँड नर्सिंग होम या संस्थेत औषधी परिणामांचे संशोधन चालू आहे. ३) ॲम्मी माजूस : अलीकडेच तेथे ॲम्मी माजूस या लॅटिन नावाने ओळखण्यात येणाऱ्या इजिप्शियन वनस्पतींच्या ( हिंदी नाव खंबी ) कोड अथवा श्वेतकुष्ठ या रोगावरील उपचारासंबंधी संशोधन चालू आहे. भारताशिवाय पाकिस्तान व बांगलादेशातही युनानी वैद्यक उपयोगात आहे.

**युनानी वैद्यकाचे फायदे**

१) नैसर्गिक उपचार पद्धती : ही पद्धती औषधीय वनस्पती आणि नैसर्गिक घटकांवर आधारित आहे.

२) संपूर्ण शरीराचे संतुलन : यामध्ये फक्त एकाच रोगावर उपचार न करता शरीरातील एकूण संतुलनावर लक्ष केंद्रित केले जाते.

३) दीर्घकालीन आरोग्य सुधारणा : शरीराचे संतुलन राखल्यामुळे दीर्घकालीन आरोग्य सुधारणा होते.

४) रोगप्रतिकारशक्ती वाढवते: ही पद्धत शरीराच्या अंतर्गत रोगप्रतिकारशक्तीला चालना देते, ज्यामुळे शरीर रोगांशी लढण्यासाठी अधिक सक्षम होते.

५) विशिष्ट रोगांवर प्रभावी: मस्क्यूकोस्केलेटल विकार आणि पचनसंस्थेच्या विकारांवर (जीआयटी विकार) युनानी उपचार प्रभावी असल्याचे दिसून आले आहे.

६) आहार आणि जीवनशैलीवर भर: उपचारांमध्ये योग्य आहार आणि जीवनशैलीचा समावेश असल्याने रुग्णाला सर्वांगीण आराम मिळतो